**SHRI VYANKATESH ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE**
**DEULGAON RAJA DIST. BULDANA**

**A RESEARCH PROJECT**
**ON**

# A STUDY OF SUBSISTENCE COST WEIGHTED PRICE INDEX OF COMMAN FAMILIES IN DEULGAON RAJA CITY FOR THE YEAR 2022-23 (BASE YEAR: 1999-2000)

**UNDERTAKEN BY:**
**THE DEPARTMENT OF ECONOMICS**
**(WITH THE ACTIVE PARTICIPATION OF STUDENTS)**

**INSPIRED BY**
**PRINCIPAL DR. GAJANAN B.JADHAV**

**GUIDED BY:**
**SHRI. DNYANESHWAR V. GORE**
**ASST. PROFESSOR & HEAD,**
**DEPARTMENT OF ECONOMICS**

**April, 2024**

# प्रास्ताविक

पारंपरिक शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यंच्या अंगी विविध मृदूकौशल्ये (Soft Skills) विकसित करण्याच्या दृष्टीकोनातुन अर्थशास्त्र विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या उपक्रमांचा एक भाग म्हणजे प्रस्तुत विद्यार्थी संशोधन प्रकल्प.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची बीजे रुजविण्याच्या उद्देशाने अर्थशास्त्र विभागाच्या वतीने प्रस्तुत विद्यार्थी संशोधन प्रकल्प (Students' Research Project) साठी" देऊळगाव राजा शहरातील कुटुंबांच्या जीवननिर्वाह खर्चाचा घाऊक किंमतीनुसार सन २०२२-२३ साठीचा भारांकित किंमत निर्देशांक" या विषयाची निवड करण्यात आलेली आहे. प्रस्तुत संशोधन प्रकल्पासाठी सन १९९९-२००० या आधार वर्षातील सामान्य व्यक्तींकडून दैनंदिन जीवनात उपयोगात आणल्या जाणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंच्या घाऊक किंमती विचारात घेतलेल्या आहेत. जीवनावश्यक वस्तूंच्या घाऊक किमती संकलित करण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समिती, देऊळगाव राजा यांच्या वार्षिक अहवालांचा तसेच भारत सरकारच्या आर्थिक पाहणी अहवालांचा आधार घेतलेला आहे.

प्रस्तुत संशोधन प्रकल्पासाठी देऊळगाव राजा शहरातील सिव्हिल कॉलनी, संजयनगर, अमृतनगर आणि त्र्यंबकनगर अशा विविध परिसरांतून एकूण १०० कुटुंबाची यादृच्छिक पद्धतीने (Randomly) निवड करून त्यांच्याकडून महाविद्यालयातील कला शाखेतील अर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांनि प्रश्नावली (Questionnaire) पद्धतीने माहिती संकलित करून तिचे विश्लेषण केलेले आहे.

प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गोरे
प्रमुख, अर्थशास्त्र विभाग

svc draja.economics

## The List of Students Who have participated in the work of Survey

| Sr. No. | Students Name | Class |
|---|---|---|
| 01. | Chinchole Abhishek Baban | B.A.III |
| 02. | Ramane Abhishek Parmeshwar | B.A.III |
| 03. | Mane Adinath Kailas | B.A.III |
| 04. | Chhadidar Akshay Rameshwar | B.A.III |
| 05. | Dahile Ashwini Praful | B.A.III |
| 06. | Bawre Baljitsing Ajitsing | B.A.III |
| 07. | Kharat Bhagyashree Dattatray | B.A.III |
| 08. | Bansode Durga Nagesh | B.A.III |
| 09. | Lokhande Ganesh Sanjay | B.A.III |
| 10. | Kharat Gayatri Rajesh | B.A.III |
| 11. | Kasare Girish Dipak | B.A.III |
| 12. | Nikalje Kajal Sheshrao | B.A.III |
| 13. | Magar Kalpana Ganesh | B.A.III |
| 14. | Poharkar Kiran Gajanan | B.A.III |
| 15. | Latake Krishna Santosh | B.A.III |
| 16. | Khandare Laxmi Sahebrao | B.A.III |
| 17. | Punde Maheshwari Mohan | B.A.III |
| 18. | Thete Manisha Achyutrao | B.A.III |
| 19. | Sonune Nikhil Nitin | B.A.III |
| 20. | Magar Nita Ganesh | B.A.III |
| 21. | Rathod Pooja Ganesh | B.A.III |
| 22. | Waghmare Pooja Vishnu | B.A.III |
| 23. | Sambhare Poonam Arjun | B.A.III |
| 24. | Waghmare Prathmesh | B.A.III |
| 25. | Sable Puja Parmeshwar | B.A.III |
| 26. | Zore Punam Ganesh | B.A.III |
| 27. | Bansode Ranjit Gopichand | B.A.III |
| 28 | Mule Renuka Gajanan | B.A.III |
| 29. | Mane Sachin Krushna | B.A.III |
| 30. | Chavhan Sachin Premdas | B.A.III |

# देऊळगाव राजा शहरातील सर्वसामान्य कुटुंबांच्या जीवन निर्वाह खर्चाचा घाऊक किंमतीनुसार सन २०२२-२३ साठीचा भारांकित किंमत निर्देशांक (आधार वर्ष: सन १९९९-२०००)

- **प्रास्ताविक (Introduction):**

जलद गतीने आर्थिक विकास साध्यकरणे हे प्रत्येक राष्ट्राच्या आर्थिक धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट असते. परंतु सन १९९०मध्ये संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमासाठी(United Nations Development Programme-UNDP) केलेल्या अभ्यासामध्ये जगप्रसिद्ध नोबेल पारितोषिक विजेते भारतीय अर्थशास्त्रज्ञ भारतरत्न डॉ. अमर्त्य सेन आणि पाकिस्तानी अर्थशास्त्रज्ञ डॉ. मेहबूब-उल-हकयांनी"मानवी चेहऱ्यासह आर्थिक विकास"(Economic Development with Human Face)हिसंकल्पना जगासमोर मांडली. त्यानंतर संपूर्ण जगातील प्रत्येक अर्थव्यवस्थेमध्ये योजनाकार आणि धोरणकर्त्यांकडून अर्थव्यवस्थेमधील अगदी सामान्यातील सामान्य व्यक्ती म्हणजेच विकासाच्या प्रक्रियेतील शेवटचा व्यक्ती केंद्रबिंदू मानूनच आर्थिक नियोजन व आर्थिक विकासाचे प्रयत्न केले जात आहेत.

भारतीय अर्थव्यवस्थेबाबत गत अडीच-तीन दशकांपासून म्हणजेच आर्थिक सुधारणोत्तर कालावधीदरम्यान केंद्र सरकार आणि विविध राज्य सरकारांकडून

svcdraja.economics

देशातील 'आम आदमी' (Common Man)विकासाचा केंद्रबिंदू मानून विकासाच्या प्रक्रियेला मानवी चेहरा प्रदान करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.परंतु कोणत्याही आर्थिक धोरणाची यशस्विता हि त्या विशिष्ट धोरणापासून अर्थव्यवस्थेतील सकल देशांतर्गत उत्पादित आणि दरडोई देशांतर्गतउत्पादिताच्या मूल्यातील लक्षणीय वृद्धीबरोबरच सामान्य जनतेच्या म्हणजेच 'आम आदमी'च्यादैनंदिन उत्पन्न-उपभोग आणि राहणीमानाच्या पातळीतील वृद्धीवर अवलंबून असते. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये अर्थव्यवस्थेतील सकल देशांतर्गत उत्पादिताच्या आणि दरडोई देशांतर्गत उत्पादिताच्या मूल्यातील वृद्धीबरोबरच अर्थव्यवस्थेतील सामान्य किंमत पातळीमध्येही वाढ घडून येत असते.

अशा स्थितीमध्ये दरडोई देशांतर्गत उत्पादिताच्या मूल्यातील वृद्धीपेक्षा अर्थव्यवस्थेतीलसामान्य किमतपातळीतील वृद्धिदर अधिक राहिल्यासलोकांची क्रयशक्ती/ खरेदीक्षमता व पर्यायाने उपभोग व राहणीमानाची पातळी घटत जाते. परिणामतः अर्थव्यवस्थेतील लोकांची जीवनमान पातळी व राहणीमानाचा दर्जा यावर त्याचे विपरीत परिणाम घडून येतात. अर्थशास्त्रीय विश्लेषण पद्धतीनुसार किंमत निर्देशांक (Price Index) या सांख्यकीय साधनांचा अथवा तंत्राचा अवलंब करून एखाद्या अर्थव्यवस्थेतील दरडोई उत्पन्न आणि उपभोगाची पातळी

svcdraja.economics

तसेच सामान्य किंमत पातळी यांतील परस्पर संबंधांवरून लोकांच्या जीवनमान व राहणीमानाच्या पातळीतील बदलांचे अध्ययन करता येते.

- **किंमत निर्देशांकाची संकल्पना (Concept of Price Index):**

एखाद्या अर्थव्यवस्थेतील सामान्य किंमत पातळीतील बदलांचे प्रमाण किती आहे? किंमत पातळीतील बदलांचा सामान्य जनतेच्या उपभोग खर्च व राहणीमानाच्या पातळीवर किती व कशा प्रकारचा परिणाम झालेला आहे? आर्थिक विकासाला मानवी चेहरा प्रदान करण्याच्या प्रक्रियेला सामान्य किंमत पातळीतील बदल पूरक आहेत किंवा नाहीत?किंमत पातळीतील बदल हे अर्थव्यवस्थेच्या जलद, चिरंतन आणि सर्वसमावेशक विकाच्या उद्दिष्टाला अनुकूल आहेत किंवा नाहीत? इत्यादी विविध प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी सर्वप्रथम अर्थव्यवस्थेतील सामान्य किंमत पातळीतील बदलांची दिशा व तीव्रता स्पष्ट करणे आवश्यक असते.

अर्थशास्त्रीय विश्लेषण पद्धतीनुसार अर्थव्यवस्थेतील सामान्य किंमत पातळीतील बदलांचे अध्ययन करण्यासाठी किंमत निर्देशांकया सांख्यकीय साधनाचा अथवा तंत्राचा अवलंबकेला जातो.विविध अर्थशाश्त्रज्ञ आणि अभ्यासकांनी केलेल्या व्याख्यांच्या अभ्यासावरून किंमत निर्देशांकाची संकल्पना पुढील प्रमाणे स्पष्ट करता येते:

www.drraja.economics

"आधार वर्षाच्या तुलनेत चालू वर्षातील सामान्य किंमत पातळीमध्ये किती प्रमाणात बदल (वाढ किंवा घट) झालेली आहे याचे मापन करण्यासाठी उपयोगात आणले जाणारे सांख्यिकीय तंत्र किंवा साधन म्हणजेच किंमत निर्देशांक होय"

दुसऱ्या शब्दांत, कोणत्याही अर्थव्यवस्थेतील सामान्य किंमत पातळीमध्ये आधार वर्षाच्या तुलनेत चालू वर्षामध्ये झालेला बदल किती प्रमाणात आहे याचे मापन करण्यासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या सांख्यकीय साधनालाच अर्थशास्त्रामध्ये किंमत निर्देशांकअसे संबोधतात.

- **किंमत निर्देशांकाचे प्रकार (Types of Price Index):**

किंमत निर्देशांकाची रचना करताना उपयोगात आणल्या जाणाऱ्या पद्धतीनुसार म्हणजेच किंमत निर्देशांकाच्या रचनेमध्ये विचारात घेतलेल्या वस्तुंना देण्यात येणाऱ्या महत्वानुसार किंमत निर्देशांकाचे (अ) सरल किंमत निर्देशांक आणि (ब) भारांकित किंमत निर्देशांक असे दोन प्रकार पडतात.

**(अ) सरल किंवा साधा किंमत निर्देशांक( Simple Price Index):**

किंमत निर्देशांकाची रचना करत असताना विचारात घेतलेल्या वस्तूंपैकी कोणतीही वस्तू कमी किंवा अधिक महत्वाची न मानता सर्व वस्तुंना सामान महत्वदेऊन निर्देशांकाचे मापन केले जाते तेव्हा त्यास साधा किंवा सरल किंमत निर्देशांक असे संबोधले जाते.

svc.draja.economics

दुसऱ्या शब्दांत, किंमत निर्देशांकाची रचना करत असताना विचारात घेतलेल्या सर्व वस्तू सामान महत्वाच्या गृहीत घेऊन किंमत निर्देशांकाचे मापन केले जाते तेव्हा त्यास साधा किंवा सरल किंमत निर्देशांक असे म्हणतात.

(ब) भारांकित किंमत निर्देशांक (Weighted Price Index):

किंमत निर्देशांकाची रचना करत असताना विचारात घेतलेल्या विविध वस्तुंनाउपभोग खर्चातील महत्वानुसार कमी-अधिक महत्व देऊन किंमत निर्देशांकाचे मापन केले जाते तेव्हा त्यास भारांकित किंमत निर्देशांक असे म्हणतात.

दुसऱ्या शब्दात, किंमत निर्देशांकाची रचना करत असताना विचारात घेतलेल्या विविध वस्तुंना एकूण उपभोग खर्चातील प्रमाणानुसार भारांकन देऊन निर्देशांकाचे मापन केले जाते तेव्हा त्यास भारांकित किंमत निर्देशांका असे संबोधले जाते.

- किंमत निर्देशांकाची रचना (Structure of Price Index):

किंमत निर्देशांक तयार करताना ज्या विविध टप्प्यांतून जावे लागते त्यांनाच किंमत निरसदेशांकची रचना असे म्हणतात. किंमत निर्देशांकाची रचना पुढील प्रमाणे स्पष्ट करता येते:

svc draja economics

## १. किंमत निर्देशांकाचा उद्देश निश्चित करणे :

किंमत निर्देशांकाची रचना करताना सर्वप्रथम किंमत निर्देशांकाचा उद्देश निश्चित केला जातो. म्हणजेच किंमत निर्देशांका कोणत्या कारणासाठी तयार करावयाचा आहे ते सुनिश्चित केले जाते. उदा. औद्योगिक श्रमिकांच्या दैनंदिन खर्च किंमत निर्देशांक, कृषी उत्पादनाच्या आधारभूत किमतींचा किंमत निर्देशांक इत्यादी.

## २. आधार वर्षाची निवड करणे :

किंमत निर्देशांकाच्या रचनेतील दुसरा महत्वाचा टप्पा म्हणजे किंमत निर्देशांकासाठी आधार वर्षाची निवड करणे. आधार वर्षातील किंमत निर्देशांकाचे मूल्य नेहमी १००इतके गृहीत घेतले जाते. आधार वर्षातील किंमत निर्देशांकाच्या मूल्याशी चालू वर्षातील किंमत निर्देशांकाची तुलना केली जाते. आधार वर्षाची निवड करत असताना घ्यावयाची मुख्य दक्षता म्हणजे आधार वर्ष हे एक सामान्य आर्थिक वर्ष असावे. म्हणजेच त्या आर्थिक वर्षादरम्यान दुष्काळ, अतिवृष्टी, महापूर, त्सुनामी, भूकंप, इत्यादींसारखी नैसर्गिक किंवा युद्ध, दहशतवादी अथवा नक्सलवादी हल्ले यासारखी मानव निर्मित संकटे आलेली नसावीत. तसेच अति उत्पादनाची स्थिती देखील निर्माण झालेली नसावी.

svcdraja economics

थोडक्यात किंमत निर्देशांकाची आधार वर्ष हे एक सर्वार्थाने एक सामान्य वर्ष असले पाहिजे.

३ . **वस्तू व सेवांची यादी तयार करणे :**

आधार वर्षाच्या निवडीनंतर किंमत निर्देशांकाच्या रचनेतील पुढचा टप्पा म्हणजे प्रातिनिधिक वस्तू व सेवांची यादी तयार करणे. किंमत निर्देशांकाच्या उद्देशानुसार प्रातिनिधिक वस्तू व सेवांची यादी तयार केली जाते. निर्देशांकासाठी जो नमुना (sample)निवडलेला असतो त्यानुसार प्रातिनिधिक वस्तू व सेवांची यादी तयार करणे आवश्यक असते.निर्देशांकाच्या रचनेसाठी निवडलेल्या प्रातिनिधिक वस्तू व सेवांची यादीखूप लहान किंवा खूप मोठी नसावी. तसेच निर्देशांकाच्या रचनेसाठी आवश्यक वस्तू व सेवांचा यादीमध्ये समावेश असणे आवश्यक ठरते.

४ . **वस्तू व सेवांच्या किमती संकलित करणे :**

प्रातिनिधिक वस्तू व सेवांच्या निवडीनंतर वस्तूंच्या किमती संकलित केल्या जातात. किमती संकलित करत असताना यादीतील सर्व वस्तूंसाठी घाऊक किमती (Wholesale Prices)आणि किरकोळ किमती (Retail Prices)यापैकी एकाच प्रकारच्या किमती संकलित

svc.draja.economics

करणे आवश्यक ठरते.किरकोळ किमतींमध्ये प्रदेशनिहाय बदल (variations)दिसून येतात त्यामुळे संपूर्ण अर्थव्यवस्थेसाठी किंमत निर्देशांक तयार करत असताना विशेषतः अचूक निष्कर्ष प्राप्त करण्यासाठी सर्व वस्तूंसाठी घाऊक किमती (Wholesale Prices)विचारात घेतल्या जातात.

## ५. योग्य सांख्यिकीय सूत्राची निवड करणे :

किंमत निर्देशांकाच्या रचनेतील एकमहत्वाचा टप्पा म्हणजे योग्य सांख्यियिकीय सूत्राची निवड करणे. किंमत निर्देशांक तयार करताना(अ) सरल किंमत निर्देशांक आणि (ब) भारांकित किंमत निर्देशांक अशा दोन प्रकारे किंमत निर्देशांक तयार करतायेतो. त्यापैकी ज्या प्रकारचा किंमत निर्देशांक तयार करावयाचा आहे त्याच सांख्यिकीय सूत्राचा वापरकरणे आवश्यक असते.

सरल किंमत निर्देशांकाची रचना करत असताना विचारात घेतलेल्या सर्व वस्तू सामान महत्वाच्या गृहीत घेऊन किंमत निर्देशांकाचे मापन केले जाते. भारांकित किंमत निर्देशांकाची रचना करत असताना विचारात घेतलेल्या विविध वस्तुंना एकूण उपभोग खर्चातील प्रमाणानुसार भारांकन देऊन निर्देशांकाचे मापन केले जाते.

svc.draja.economics

## ६. निष्कर्ष मांडणी :

किंमत निर्देशांकाच्या रचनेतील अंतिम टप्पा म्हणजेनिष्कर्ष मांडणी होय.सुनिश्चित उद्देशानुसार संकलित तथ्यांचे सुयोग्य सांख्यिकीय सूत्राच्या साहाय्याने विश्लेषण केल्यानंतर प्राप्त निष्कर्षांचा अन्वयार्थ लावणे आवश्यक असते.

विश्लेषणानंतर आधार वर्षातील किमतीच्या तुलनेत चालू वर्षातील किमतीमध्ये किती प्रमाणात बदल झालेला आहे याचे विश्लेषण करता येते. तसेच किंमत पातळीतील बदलांचा सामान्य जनतेच्या राहणीमानाच्या पातळीवर कशा प्रकारचा परिणाम झालेला आहे याचे अनुमानान (Forecasting) करता येते.

svc.drraja.economics

- **संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी "देऊळगाव राजा शहरातील कुटुंबांच्या जीवननिर्वाह खर्चाचा घाऊक किमतीनुसार सन २०२२-२३ साठीचा भारांकित किंमत निर्देशांक" या विषयाची निवड करण्यात आलेली असून प्रस्तुत किंमत निर्देशांकांसाठी सन १९९९-२००० हे आधार वर्ष (Base Year)निश्चित करण्यात आलेले आहे. सन १९९९-२००० हे आर्थिक वर्ष केंद्रीय सांख्यिकीय संघटना (Central Statistical Organization - CSO)यांच्या कडून भारताच्या राष्ट्रीय

उत्पन्न मापनासाठी आधार वर्ष म्हणून निवडलेले आहे. म्हणूनच प्रस्तुत अभ्यासासाठी सन १९९९-२०००या आर्थिक वर्षाची आधार वर्ष (Base Year) म्हणून निवड केलेली आहे.

प्रस्तुत संशोधन प्रकल्पासाठी सन १९९९-२००० या आधार वर्षातील सामान्य व्यक्तींकडून दैनंदिन जीवनात उपयोगात आणल्या जाणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंच्या घाऊक किमती विचारात घेतलेल्या आहेत. जीवनावश्यक वस्तूंच्या घाऊक किमती संकलित करण्यासाठी कृषी उत्पन्न बाजारसमिती, देऊळगाव राजा यांच्या वार्षिक अहवालांचा तसेच भारत सरकारच्या आर्थिक पाहणी अहवालांचा आधार घेतलेला आहे.

प्रस्तुत संशोधन प्रकल्पासाठी देऊळगाव राजा शहरातील सिव्हिल कॉलनी, संजयनगर, अमृतनगर आणि त्र्यंबकनगर अशा विविध परिसरांतून एकूण १०० कुटुंबाची दृच्छिक पद्धतीने (Randomly) निवड करून त्यांच्याकडून महाविद्यालयातील कला शाखेतील अर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यां निप्रश्नावली (Questionnaire) पद्धतीने माहिती संकलित करून तिचे विश्लेषण केलेले आहे.

svc.draja.economics

- **संशोधन विषयाचे महत्व (Importance of the Study) :**

एखाद्या अर्थव्यवस्थेतील सामान्य किंमत पातळीतील बदलांचे प्रमाण किती आहे? किंमत पातळीतील बदलांचा सामान्य जनतेच्या उपभोग खर्च व

राहणीमानाच्या पातळीवर किती व कशाप्रकारचा परिणाम झालेला आहे? आर्थिक विकासाला मानवी चेहरा प्रदान करण्याच्या प्रक्रियेला सामान्य किंमत पातळीतील बदल पूरक आहेत किंवा नाहीत? किंमत पातळीतील बदल हे अर्थव्यवस्थेच्या जलद, चिरंतन आणि सर्वसमावेशक विकाच्या उद्दिष्टाला अनुकूल आहेत किंवा नाहीत? इत्यादी विविध प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी सर्वप्रथम अर्थव्यवस्थेतील सामान्य किंमत पातळीतील बदलांची दिशा व तीव्रता स्पष्ट करणे आवश्यक असते. अर्थशास्त्रीय विश्लेषण पद्धतीनुसार अर्थव्यवस्थेतील सामान्य किंमत पातळीतील बदलांचे अध्ययन करण्यासाठी किंमत निर्देशांक या सांख्यकीय साधनाचा अथवा तंत्राचा अवलंब केला जातो.

प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातून देऊळगाव राजा शहरातील सामान्य लोकांच्या जीवन निर्वाह खर्चाच्या पातळीतील सन १९९९-२००० ते सन २०२२-२३ या कालावधी दरम्यान किती प्रमाणात बदल झालेला आहे तसेच प्रस्तुत कालावधी दरम्यान त्यांच्या उत्पन्न पातळीत किती प्रमाणात बदल झालेला आहे याचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. या माध्यमातून किंमत पातळीतील बदलांचा देऊळगाव राजा शहरातील सामान्य जनतेच्या उपभोग खर्च व राहणीमानाच्या पातळीवर किती व कशा प्रकारचा परिणाम झालेला आहे याचे देखील विश्लेषण करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

svc.drajaeconomics

- **संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील उद्दीष्ट्ये विचारात घेतलेली आहेत:

१. देऊळगाव राजा शहरातील सर्वसामान्य कुटुंबांच्या जीवन निर्वाह खर्चाचा घाऊक किंमतीनुसार सन २०२२-२३ साठीचा भारांकित किंमत निर्देशांकाचे मापन करणे.

२. देऊळगाव राजा शहरातील सर्वसामान्य कुटुंबांच्या दैनंदिन उत्पन्न व खर्चाचे विश्लेषण करणे.

३. देऊळगाव राजा शहरातील सर्वसामान्य कुटुंबांकडून उपयोगात आणल्या जाणाऱ्या विविध जीवनावश्यक वस्तूंच्या किंमत पातळीतील बदलांचे विश्लेषण करणे.

४. देऊळगाव राजा शहरातील सर्वसामान्य कुटुंबांच्या दैनंदिन उपभोग खर्च व राहणीमानाच्या पातळीचे विश्लेषण करणे.

५. देऊळगाव राजा शहरातील सर्वसामान्य कुटुंबांच्या उत्पन्न, खर्च व राहणीमानाच्या पातळीत सुधारणेसाठी धोरणात्मक उपाययोजना सुचविणे.

svc.draja.economics

## • तथ्य मांडणी व सांख्यकीय माहितीचे विश्लेषण :


प्रस्तुत संशोधन प्रकल्पासाठी देऊळगाव राजा शहरातील सिव्हिल कॉलनी, संजयनगर, अमृतनगर आणि त्र्यंबकनगर अशा विविध परिसरांतून एकूण १०० कुटुंबाची यादृच्छिक पद्धतीने (Randomly) निवड करून त्यांच्याकडून प्रश्नावली (questionnaire) पद्धतीने माहिती संकलित करण्यात आलेली असून विश्लेषण करण्यासाठी संकलित सांख्यकीय माहिती पुढील तक्त्यात दर्शविलेली आहे.

### १. सन २०२२-२३ मधील कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न

तक्ता क्र. १ :सन २०२२-२३ मधील कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न

| उत्पन्न पातळी | रु. १,००० ते रु. ४९,००० | रु. ५०,००१ ते रु. ९९,००० | रु. १ लाख ते रु. १.४९ लाख | रु. १.५० लाखपेक्षा अधिक |
|---|---|---|---|---|
| कुटुंबांची संख्या | ४० | ३१ | १८ | ११ |

economics




तक्ता आणि विभाजित वर्तुळाकृतीच्या निरीक्षणावरून स्पष्ट होते कि, एकूण १०० पैकी ४० कुटुंबांचे सन २०२२-२३ मधील एकत्रित वार्षिक उत्पन्न रु . १,००० ते रु. ४९,००० दरम्यान होते. तर रु. ५०,००१ ते रु. ९९,००० या दरम्यान उत्पन्नपातळी असणाऱ्या कुटुंबांची संख्या ३१ एवढी होती. १८ कुटुंबांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. १ लाख ते रु. १.४९ लाख एवढे होते. तर उर्वरित ११ कुटुंबांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. १.५० लाखांपेक्षा अधिक असल्याचे आढळून आले.


थोडक्यात, नमुन्यातील एकूण ७१% कुटुंबांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. ९९,००० किंवा त्यापेक्षा कमी होते. म्हणजेच निवडलेल्या नमुन्यातील बहुतांश कुटुंबांची उत्पन्नपातळी दारिद्र्यरेषेखाली असल्याचे दिसून येते.

svcdraja.eco

## २. स्वतःच्या मालकीचे घर आहे काय ?

संशोधनासाठी निवडलेल्या नमुन्यातील विविध लोकांकडून स्वतःच्या मालकीचे घर आहे किंवा नाही या प्रश्नासंदर्भात प्राप्त माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण पुढीलप्रमाणे आहे:

| तक्ता क्र. २: स्वतःच्या मालकीचे घर घर आहे काय ? | |
|---|---|
| होय | नाही |
| ३५ | ६५ |





तक्ता आणि विभाजित वर्तुळाकृतीच्या निरीक्षणावरून स्पष्ट होते कि, प्रकल्पासाठी निवडलेल्या नमुन्यातील एकूण 35% कुटुंबांकडे स्वतःच्या मालकीचे घर होते तर उर्वरित ६५% कुटुंबांकडे राहत्या घरांचे मालकी

हक्क नसल्याचे दिसून आले. म्हणजेच, नमुन्यातील ६५% कुटुंब निवासासाठी किरायाच्या घरांचा वापर करत होते.

## ३ . दैनंदिन उपभोग्य वस्तूंवरील सरासरी मासिक खर्च:

तक्ता क्र. ३ : दैनंदिन उपभोग्य वस्तूंवरील सरासरी मासिक खर्च

| अनु. | वस्तू व सेवांची यादी | आधार वर्षातील मासिक खर्च | चालू वर्षातील मासिक खर्च |
|---|---|---|---|
| १. | गहू | ८०० | १६०० |
| २. | साखर | ३०० | ५०० |
| ३. | चहा | २०० | ३०० |
| ४. | कापड | १०० | २०० |
| ५. | घरगुती इंधन | २०० | ६०० |
| ६. | गोडेतेल | २०० | ८०० |
| ७. | घरभाडे | ७०० | १५०० |
| ८. | तांदूळ | ३०० | ६०० |
| ९. | ज्वारी | ५०० | १००० |
| १०. | तूरडाळ | ३०० | ५०० |
| ११. | मूगडाळ | २०० | ५०० |
| १२. | हरभरा डाळ | २०० | ४०० |
| १३. | घरगुती वीज | ३०० | ४०० |
| १४. | पालेभाज्या | २०० | ६०० |




**उपरोक्त तक्ता क्र. २च्या निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष प्राप्त होतात:**

१. गहू, ज्वारी, हरभराडाळ यासारख्या अन्नधान्य वस्तूंबरोबरच कापड आणि घरभाडे यासारख्या इतर मूलभूत गरजेच्या वस्तूंच्या किंमती विश्लेषण कालावधीदरम्यान दुपटीने वाढलेल्या आहेत. म्हणजेच या वस्तूंच्या किंमती आधार वर्षाच्या तुलनेत दुप्पट झालेल्या आहेत.

२. साखर, चहा, घरगुती वीज या सारख्या वस्तूंच्या किंमतीमध्ये विश्लेषण कालावधी दरम्यान झालेली वाढ दुपटीपेक्षा कमी आहे.

३. तर घरगुती इंधन, गोडेतेल, मूगडाळ, आणि पालेभाज्या या सारख्या जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीमध्ये आधार वर्षाच्या तुलनेत तीन पट किंवा अधिक प्रमाणात वृद्धी झालेली दिसून येते.

## ४. देऊळगाव राजा शहरातील सामान्य कुटुंबांच्या जीवन निर्वाह खर्चाचा घाऊक किंमतीनुसार भारांकित किंमत निर्देशांक :

| वस्तू व सेवांचीयादी | आधार वर्षातील मासिक खर्च | चालू वर्षातील मासिक खर्च | भारांक | प्रत्येक वस्तूचा भरीत निर्देशांक |
|---|---|---|---|---|
| गहू | ८०० | १६०० | ८ | १६०० |
| साखर | ३०० | ५०० | ४ | ६६६.६७ |
| चहा | २०० | ३०० | २ | ३०० |
| कापड | १०० | २०० | १ | २०० |
| घरगुती इंधन | २०० | ६०० | १ | ३०० |
| गोडेतेल | २०० | ८०० | १ | ४०० |
| घरभाडे | ७०० | १५०० | ७ | १५०० |
| तांदूळ | ३०० | ६०० | २ | ४०० |
| ज्वारी | ५०० | १००० | ६ | १२०० |
| तूरडाळ | ३०० | ५०० | ४ | ६६६.६७ |
| मूगडाळ | २०० | ५०० | ४ | १००० |
| हरभरा डाळ | २०० | ४०० | ३ | ६०० |
| घरगुती वीज | ३०० | ४०० | ३ | ३९९.९९ |
| पालेभाज्या | २०० | ६०० | ५ | १५०० |
| | | | भारांकांची बेरीज = ४१ | वस्तूंच्याभारितनिर्देशांकाचीबेरीज = १०७३३.३३ |

भारांकितकिंमतनिर्देशांक (Wieghted Price Index ) = विविध वस्तूंच्या प्रतिशतकांची बेरीज / भारांकांची बेरीज

= १०७३३.३३ / ४१

भारांकितकिंमत निर्देशांक (Wieghted Price Index ) = २६१.७९

- निष्कर्ष:

सन १९९९-२००० च्या आधार वर्षानुसार देऊळगाव राजा शहरातील सर्वसामान्य कुटुंबांच्या जीवन निर्वाह खर्चाचा घाऊक किंमतीनुसार सन २०२२-२३ साठीच्या भारांकित किंमत निर्देशांकाचे मूल्य २६१.७९ एवढे प्राप्त झाले. त्यावरून सहज स्पष्ट होते कि सन १९९९-२००० च्या तुलनेत सामान्य जनतेच्या दैनंदिन उपभोग खर्चामध्ये २६१.७९% वृद्धी झाल्याचे दिसून येते. परंतु विश्लेषण कालावधीदरम्यान देऊळगाव राजा शहरातील सामान्य जनतेच्या दरडोई उत्पन्न पातळीत झालेली वाढ मात्र भाववाढीच्या दरापेक्षा कमी असल्याचे स्पष्ट होते.

थोडक्यात देऊळगाव राजा शहरातील कुटुंबांच्या जीवननिर्वाह खर्चाच्या पातळीमध्ये जवळजवळ तीन पटींनी वाढ झालेली असून सरासरी उत्पन्न पातळीत मात्र त्या मानाने कमी प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते. परिणामतः देऊळगाव राजा शहरातील सामान्य जनतेच्या उपभोग व राहणीमानाच्या पातळीवर त्याचा विपरीत परिणाम होऊन 'जलद, सर्वसमावेशक आणि चिरंतन विकास' सध्या करण्याचे भारतीय

svc.draja.economics

अर्थव्यवस्थेतील दीर्घकालीन उद्दिष्ट प्राप्तीच्या मार्गात अर्थव्यस्थेतील वेगाने वाढणाऱ्या किंमती हा एक मोठा अडथळा सिद्ध होत आहेत हे यावरून सहज स्पष्ट होते.

- **उपाययोजना:**

१. जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीवर प्रभावी नियंत्रण स्थापित केल्यास सामान्य लोकांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण जीवन जगणे शक्य होईल. त्यामुळे सरकारने सामान्य जनतेच्या जीवनमानाशी संबंधित विविध जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती प्रभावीपणे नियंत्रित करणे आवश्यक ठरते.

२. भारतीय अर्थव्यवस्थे तबहुतेक जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा हा सार्वजनिक वितरण प्रणाली (Public Distribution System) च्या माध्यमातून करण्यात येतो. त्याचबरोबर भारतीय खाद्य निगम (Food Corporation of India) या विविध जीवनाव्यश्यक वस्तूंचा अतिरिक्त साठा (Buffer Stock) करून ठेवत असते. अशा स्थितीमध्ये या वस्तूंच्या किंमतीमध्ये होणारी वाढ हा भारतातील सार्वजणीक वितरण प्रणालीचे अपयश सिद्ध करणारा आहे. म्हणजेच, सार्वजनिक वितरण प्रणालीतील विविध दोष दूर केल्यास जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती नियंत्रणात राहू शकतात.

३. साठेबाज व नफेखोर व्यापाऱ्यांवर तसेच जीवनावश्यक वस्तूंची कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्या लोकांवर कठोर कायदेशीर कारवाई केल्यास देखील जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती नियंत्रणात राहूश कतात.

svcdraja.economics

४. अर्थव्यस्थेतील विकासाच्या प्रक्रियेबरोबर थोड्या प्रमाणात भाववाढ होणे स्वाभाविक असते. अशा स्थितीमध्ये सामान्य जनतेला त्यांच्यातील कौशल्य व क्षमतेनुसार पुरेश्या प्रमाणात रोजगारसंधी उपलब्ध करून देऊन निश्चित उत्पन्नाची हमी प्राप्त करून दिल्यास नैसर्गिक भाववाढीमुळे सामान्य जनतेच्या उपभोग, राहणीमान तसेच गुणवत्तापूर्ण जीवनमानावर काहीही विपरीत परिणाम होणार नाहीत.

- **सारांश:**

अशा प्रकारे सन १९९९-२००० च्या आधार वर्षानुसार देऊळगाव राजा शहरातील सर्वसामान्य कुटुंबांच्या जीवन निर्वाह खर्चाचा घाऊक किंमतीनुसार सन २०२२-२३ साठीचा भारांकित किंमत निर्देशांकाच्या अभ्यासावरून सहज स्पष्ट होते कि, विश्लेषण कालावधी दरम्यान देऊळगाव राजा शहरातील सामान्य लोकांच्या किमान उपभोग खर्चामध्ये ज्या प्रमाणात वृद्धी झालेली आहे त्या तुलनेत त्यांच्या दरडोई उत्पन्न पातळीत वाढ झालेली दिसून येत नाही.

अशा स्थितीमध्ये, लोकांना पुरेश्या प्रमाणात रोजगारसंधी उपलब्ध करून देणे, निश्चित उत्पन्नाची हमी प्राप्त करून देणे, भाववाढीला जबाबदार कृत्रिम टंचाई, साठेबाजी आणि नफेखोरी अशा अवैध घटकांवर प्रभावी नियंत्रण स्थापित करणे इत्यादी उपाययोजना करणे आवश्यक ठरते.

svcdraja.economics

# देऊळगाव राजा शहरातील सर्वसामान्य कुटुंबांच्या जीवन निर्वाह खर्चाचा घाऊक किंमतीनुसार सन २०२२-२३ साठीचा भारांकित किंमत निर्देशांक (आधार वर्ष : सन १९९९-२०००)

==========================================================

## प्रश्नावली

कुटुंब प्रमुखाचे नाव व पत्ता: ______________________________________________

______________________________________________

वय: शिक्षण:

कुटुंबातील एकूण प्रौढ सदस्य संख्या :________ स्त्री:________ पुरुष:________

७ वर्षाखालील सदस्य संख्या :________ मुली:________ मुले: ________

कुटुंबातील साक्षर प्रौढ व्यक्तींची संख्या :________ स्त्री:________ पुरुष:________

कुटुंबातील कमावत्या व्यक्तींची संख्या : ________ स्त्री:________ पुरुष:________

---

प्रश्न १: सन २०२२-२३ मधील कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न किती होते?

अ) रु. 1,०००/- ते रु. ५०,०००/- ब) रु. ५०.००१/- ते 1.०० लाख

क) रु. 1.०१ लाख ते 1.५० लाख ड) रु. 1.५० लाख पेक्षा अधिक

प्रश्न २: सन २०२२-२३ मधील कुटुंबाच्या दैनंदिन उपभोगातील जीवनव्यश्यक वस्तूंची यादीव मासिक खर्च:

| वस्तू | मासिक खर्च |
|---|---|
| १. गहू | ________ |
| २. साखर | ________ |
| ३. चहा | ________ |
| ४. कापड | ________ |
| ५. घरगुतीइंधन | ________ |
| ६. गोडेतेल | ________ |
| ७. घरभाडे | ________ |

| वस्तू | मासिक खर्च |
|---|---|
| ८. तांदूळ | ________ |
| ९. ज्वारी | ________ |
| १०. तूरडाळ | ________ |
| ११. मूगडाळ | ________ |
| १२. हरभराडाळ | ________ |
| १३. वीज | ________ |
| १४. पालेभाज्या | ________ |

प्रश्न ३: घर स्वतःच्या मालकीचे आहे काय? अ) होय ब) नाही

- नसल्यास मासिक घरभाडे किती? रु.________________

प्रश्न ४: स्वतःच्या मालकीचे वाहन आहे काय?अ) होय ब) नाही

- असल्यास कोणते? अ) दोन चाकी ब) तीन चाकी क) चार चाकी

---

माहितीदात्याची स्वाक्षरी माहिती प्राप्तकर्त्यांचे नाव व स्वाक्षरी